अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जावक क्र.- अतिमआ(ज)/११६३५
दिनांक – ०८/१०/२०२१

## कार्यालयीन परिपत्रक

कोविड -१९ आजाराच्या पार्श्वभूमीवर पुणेकर नागरिकांना लसीकरण व तपासणी व्यवस्था करणेसाठी पुणे महानगरपालिकेमार्फत विविध ठिकाणी स्वॅब सेंटर व लसीकरण केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत.

सर्व खातेप्रमुख व उपायुक्त यांना सूचित करण्यात येते की, आपले अधिकार क्षेत्रातील अशा सर्व स्वॅब सेंटर व लसीकरण केंद्रांची तपासणी करून ज्या ठिकाणी ठेकेदारांमार्फत मांडव व्यवस्था करण्यात आलेली असेल किंवा खाजगी जागेत भाडे तत्वावर कोणते केंद्र असेल तर अशी सर्व केंद्रे पुणे म.न.पा.चे मालकीचे जागेत पक्के बांधकाम असलेल्या ठिकाणी त्वरित स्थलांतरीत करण्यात यावीत व त्याबाबतचा लेखी अहवाल आमचे कार्यालयाकडे कार्यालयीन परिपत्रकाचे दिनांकापासून ७ दिवसात सादर करण्यात यावेत. या उप्पर खाजगी भाड्याचे जागेत अथवा ठेकेदारामार्फत मांडव व्यवस्था उपलब्ध केलेल्या जागेत स्वॅब सेंटर अथवा लसीकरण केंद्र आढळल्यास संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल यांची गांभिर्याने नोंद घेण्यात यावी.

Raut
(रविंद्र बिनवडे)
अतिरिक्त महापलिका आयुक्त (जनरल)
पुणे महानगरपलिका
8/10/2021